दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०५ मार्च २०२५

।।सुविचार।।

कोणाच्याही सावलीखाली उभा राहिल्यावर
स्वतःची सावली कधीच निर्माण होत नाही.
**स्वतःची सावली निर्माण करण्यासाठी**
**स्वतः उन्हात उभे रहावे लागते.**

# धनंजय मुंडेंचा राजीनामा...एकनाथ शिंदे ॲक्शन मोडवर



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०३, बुलडाणा :** महायुती सरकारचा शपथविधी झाल्यापासून शिवसेना (शिंदे) पक्ष आणि भाजपामध्ये अंतर्गत धुसफूस असल्याची चर्चा आहे. बहुमत असतानाही शपथविधीसाठी लागलेला उशीर आणि त्यानंतर नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून झालेले नाराजीनाट्य, यामुळे महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याचेच चित्र दिसले. माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप विरोधकांनी केला होता. महायुतीमधील अंतर्गत राजकारणाचा पुढचा अंक आता पाहायला मिळत आहे. कारण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना एक नवी जबाबदारी दिली आहे. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) ज्या ज्या जिल्ह्यात पालकमंत्री आहेत, त्या त्या जिल्ह्यांसाठी शिवसेनेने संपर्क मंत्री नेमले आहेत. महायुती किंवा आघाडीच्या सरकारमध्ये पालकमंत्री नसलेल्या जिल्ह्यात संपर्क मंत्री नेमण्याची पद्धत जुनीच असली तरी एकनाथ शिंदेंनी हा निर्णय घेण्यासाठी जे टायमिंग साधले, त्याची चर्चा आता होताना दिसत आहे. आजच (४ मार्च) राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला आहे. तसेच राष्ट्रवादीचे दुसरे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रीपदावरही टांगती तलवार आहे.

शिवसेनेच्या एक्स हँडलवर शिवसेनेच्या ११ मंत्र्यांना एकूण २३ जिल्ह्यांची जबाबदारी दिली असल्याची यादी पोस्ट करण्यात आली आहे. या जिल्ह्यांमध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे पालक मंत्री आहेत. मंत्री उदय सामंत, संजय राठोड यांच्याकडे प्रत्येकी तीन जिल्हे तर आठ मंत्र्यांकडे प्रत्येकी दोन जिल्हे दिले आहेत. तर राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे एकच जिल्हा दिला आहे. विशेष म्हणजे, ५ फेब्रुवारी रोजी भाजपानेही आपल्या संपर्क मंत्र्यांची यादी जाहिर केली होती. त्यानंतर एकनाथ शिंदेंनीही आपल्या संपर्क मंत्र्यांची घोषणा केली.

**सर्व काही ठंडा ठंडा, कूल कूल – शिंदे**

राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये भाजपा आणि शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील नेत्यामध्ये धुसफूस सुरु असल्याची चर्चा असताना एकनाथ शिंदे यांनी १८ फेब्रुवारी रोजी माध्यमांशी संवाद साधताना, महायुतीत कोणतंही कुरघोडीचे राजकारण सुरु नसल्याचे स्पष्टीकरण शिंदेंनी दिले होते. 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझे (एकनाथ शिंदे) संबंध ठंडा ठंडा, कूल कूल आहेत', अशी मिश्किल प्रतिक्रियाही शिंदेंनी दिली होती आणि महायुतीत अंतर्गत कलहाचे वृत्त त्यांनी फेटाळून लावले.

**प्रादेशिक पक्ष संपविण्याचा भाजपावर आरोप**

भाजपा आपल्या मित्रपक्षांना संपवतो, असा एक जुना आरोप विरोधक करत असतात. देशभरात ज्या ज्या राज्यातील प्रादेशिक पक्षांशी भाजपाने युती केली. त्यांचे उदाहरण दिले जाते. महाराष्ट्रातही अनेक वर्ष संयुक्त शिवसेनेशी भाजपाची युती होती. मात्र २०१९ साली महाविकास आघाडीचा प्रयोग झाल्यानंतर भाजपाला सत्तेपासून दूर राहावे लागले होते. त्यानंतर २०२२ साली शिवसेना आणि २०२३ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. २०२४ च्या निकालानंतर भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला. त्यानंतर घडलेल्या घडामोडी या महायुतीमध्ये सूप्त संघर्ष असल्याच्या द्योतक होत्या.

## थोडक्यात

### ताम्हिणी घाटात कार व एसटी बसचा भीषण अपघात

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०४, अलिबाग :** ताम्हिणी घाटात रायगड जिल्ह्याच्या हद्दीत मंगळवारी दुपारी एसटी बस व कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील दोघांचा मृत्यू झाला असून तिघेजण जखमी आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की खेड – चिंचवड ही एसटी बस पुण्याच्या दिशेकडे जात होती. तर कार विळे गावाच्या दिशेकडे येत होती. उतार व वेग असल्यामुळे तसेच गाडीवरील ताबा सुटल्याने स्वीट कार एसटी बसला समोर जाऊन धडकली. ही धडक एवढी जोरदार होती की यामध्ये स्विफ्टच्या चालकाच्या बाजूचा भाग बसमध्ये शिरून पूर्ण चेपला गेला आहे. त्यामुळे कारचालक व चालकाच्या पाठीमागे बसलेली जेष्ठ महिला यांचा मृत्यू झाला. तसेच हे दोन्ही मृतदेह कारमध्येच अडकून पडले. सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे सदस्य घटनास्थळी जाऊन त्यांनी आधुनिक साधनांच्या माध्यमाने अडकलेले मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरु केले. कार मधील तीन जखमींना माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. जखमी मध्ये एका लहान मुलीचा देखील समावेश आहे. तर एसटी मधील कोणीही जखमी झाले नाही.

अपघाताची माहिती मिळताच विळे दूरक्षेत्र पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री. राठोड व पोलीस विनोद तांदळे घटनास्थळी पोहोचले. तसेच येथील तुषार कदम व राकेश दगडे यांनी देखील घटनास्थळी जाऊन मदतकार्य सुरू केले. माणगाव पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व पोलीस कर्मचारी हे देखील रेस्क्यू टीम सोबत घटनास्थळी पोहचले.

### २ अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या ६५ वर्षीय व्यक्तीला अटक

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०४, मुंबई :** खासगी शिकवणीबाहेर उभ्या असलेल्या दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या ६५ वर्षीय व्यक्तीला सोमवारी बोरिवली पोलिसांनी अटक केली. आरोपीविरोधात विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून बोरिवली पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत. पीडित मुली १६ व १७ वर्षे वयोगटातील आहेत. त्या सोमवारी खासगी शिकवणी बाहेर उभ्या होत्या. आरोपी तेथे आला व त्याने पीडित मुलींचा विनयभंग केला. त्यामुळे मुली घाबरल्या. मुलींनी आरडाओरडा केल्यामुळे जमावाने सदर व्यक्तीला पकडले. त्यापैकी एका पीडित मुलीने घडलेला प्रकार कुटुंबियांच्या कानावर घातला. त्यानुसार मुलीचे वडील घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पोलिसांना दूरध्वनी केला. त्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी आले व त्यांनी आरोपी ताब्यात घेतले. याप्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७४ अंतर्गत विनयभंग व पोक्सो कायदा कलम ८ अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर ६५ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली. आरोपी व तक्रारदार मुली एकमेकांना ओळखत नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# मध्य रेल्वे गर्दीचा ताण कमी करण्यासाठी लवकरच डोंबिवली ठाणे बस सेवा सुरू होणार...

**अक्षराज : संजय पंडित**
**दि.४, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली : मध्ये रेल्वेतील सर्वात जास्त गर्दीचे डोंबिवली रेल्वे स्थानक आहे. वाढत्या गर्दीवर रेल्वे प्रवाशांसाठी रेल्वे गाडी वाढविण्यात आल्या असल्या तरी गर्दीत वाढ होत असताना दिसते.

यावर कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश मोरे यांनी विशेष लक्ष देत पालिका आयुक्तांची भेट घेऊन डोंबिवली ते ठाणे बससेवा सुरु करण्याबाबत चर्चा केली. पालिका आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेत बससेवा सुरु करण्याचे आश्वासन दिले असल्याचेयाबाबत आमदार मोरे पत्रकारांशी बोलताना



म्हणाले, डोंबिवलीकरांना ठाणे शहरात जाण्याकरता रेल्वेच्या गर्दीतून जाण्याची गरज भासणार नाही.डोंबिवली पश्चिमेकडील शास्त्रीनगर रुग्णालयाजवळ ते ठाणे आणि दोन टाकी ते ठाणे शहर असा परिवहन बससेवा सुरु होणार आहे.

आपल्या मागणीचा विचार करून बससेवा सुरु करणार असल्याने पालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांचे आभार मानतो. डोंबिवली ते ठाणे अशी बससेवा सुरु होणार असल्याने आता ठाणे शहरा पर्यतचा प्रवास सुखकर होणार आहे. तिकीट दराबाबत अद्याप निश्चित झाले नाही. दरम्यान सकाळच्या वेळी डोंबिवली रेल्वे स्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. आजवर डोंबिवली ते ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे गाडीतून पडून अनेक अपघात झाले.मात्र आता डोंबिवली ते ठाणे ही परिवहन बससेवा सुरु होणार असल्याने डोंबिवली, कोपर, दिवा, मुंब्रा,कळवा आणि ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान प्रवाशांची संख्या काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.यामुळे या स्थानकादरम्यान रेल्वे अपघातांवर नियंत्रण येईल असे डोंबिवलीकर म्हणत आहे.

# कोकणात शिमगोत्सवाला सुरुवात... घरोघरी रंगणार देवभेटीचा सोहळा...

**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.०४, गुहागर (रत्नागिरी) :** कोकणात शिमगोत्सवाला मोठ्या उत्साही वातावरणात सुरुवात झाली आहे. फाल्गुन पंचमीला पाहिली होळी पेटवून कोकणात सर्वत्र शिमगोत्सवाला सुरुवात होते.गावची सहाण, देवळी, अशा पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या ग्रामदेवतेतांच्या पवित्र स्थानी, सार्वजनिक ठिकाणी आंबा,सुरमाड, फोफळी, शेवर, अशा विविध झाडांच्या रुपात पहिली होळी सजवली जाते, तर अनेक ठिकाणी ग्रामदेवतेला कौल लावून शिमगोत्सवाला सुरुवात होते. प्रामुख्याने पुढील पंधरा दिवस हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गावागावांत ढोल ताशांचा आवाज घुमू लागतो,ग्रामदेवतांचे मंदिर,सहाण,देवळी, रंगरंगोटी सह आकर्षित अशा दीप रोषणाईने फुलल्या जातात, ग्रामदेवतांच्या पालख्या सजवून प्रतिरुपांची विधिवत पूजाअर्चा करून ग्रामदेवतांच्या पालख्यांचे सर्वत्र स्वागत करण्यात येते. तर काही ठिकाणी पालख्यांच्या भेटीचा सोहळा रंगतो, दरम्यान अनेक ठिकाणी पालखी घरोघरी जाते यात देव भेटीला येतो अशी भक्तांची भावना दृढ असते,याला हजारो भक्तगण आपल्या मूळगावी हजेरी लावतात. दरम्यान गावागावांत शिमगोत्सवानिमित्त चाकरमानी मोठ्या संख्येने दाखल होत असून, पुढील काही दिवस कोकणात गाव वाडी वस्तीवर उत्साही वातावरण असणार आहे. घरोघरी देवभेटीचा सोहळा रंगणार असल्याने अबालवृद्धांच्या उत्साहाला उधाण आले आहे.

# होय, आम्हीच होणार चॅम्पियन ! सेमीफायनल मध्ये ऑस्ट्रेलियाला धोबीपछाड !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०४, दुबई :** विराट कोहलीच्या ८४ धावा, विराट–श्रेयसची ९४ धावांची भागीदारी, हार्दिकचे दोन षटकार आणि राहुलच्या विजयी षटकारासह भारताने ऑस्ट्रेलियाकडून आयसीसी स्पर्धांच्या पराभवाचा बदला घेत दणदणीत विजय नोंदवला आहे. भारताने उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीसह ऑस्ट्रेलियाला नमवत शानदार विजय मिळवला आहे. यासह भारताने ऑस्ट्रेलियावर ४ विकेट्सने मोठा विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे.






टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. दुबईत खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा ५ विकेट राखून पराभव करत सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत धडक मारली. टीम इंडियाच्या विजयाचे हिरो मोहम्मद शमी आणि विराट कोहली ठरले. तर विराट कोहली सामन्याचा सामनावीर ठरला.

ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी २६५ धावांचे आव्हान दिले होते. धावांचा पाठलाग करताना भारताने सुरूवातीला २ विकेट्स गमावले होते.

पण नंतर विराट कोहली आणि श्रेयस अय्यरने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. यासह भारताला सामन्यात कायम ठेवलं. विराट कोहली पाच चौकारांसह ९८ चेंडूत ८४ धावा करत बाद झाला. विराटने उत्कृष्ट फलंदाजी करत सर्वाधिक धावा एकेरी धाव घेत काढल्या आणि ऑस्ट्रेलियावर दबाव वाढवला. तर श्रेयस अय्यरने ४५ धावांची खेळी केली. तर अक्षरने २७ धावांची खेळी केली. तर हार्दिकने अखेरच्या षटकांमध्ये शानदार ३ षटकार आणि एक चौकार लगावत संघाचा विजय सोपा केला आणि २८ धावांची खेळी करत बाद झाला. तर केएल राहुल ४२ धावा करत नाबाद परतला.

तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कांगारू संघाकडून कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि ॲलेक्स कॅरी वगळता इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आला नाही. स्टीव्ह स्मिथने ९६ चेंडूत ७३ धावांची खेळी केली, तर ॲलेक्स कॅरीनेही ५७ चेंडूत ६१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. भारताच्या गोलंदाजांनी कायम भारताला सामन्यात ठेवत संघाच्या विजयाच्या पाया रचला.

उर्वरित फलंदाजांपैकी एकाही फलंदाजाला ५० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. याचे कारण भारतीय गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली. मोहम्मद शमीने १० षटकांत ४८ धावांत तीन विकेट घेतले, तर वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी दोन विकेट घेतले. हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. कुलदीप यादव हा एकमेव गोलंदाज होता ज्याला एकही विकेट मिळाली नाही.

वर्ल्ड कप २०११ च्या उपांत्यपूर्व फेरीत टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली आणि त्यानंतर विजेतेपदही पटकावले होते. यावेळी टीम इंडिया जेतेपदाच्या जवळ आली आहे आणि उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला नमवत स्पर्धेतून बाहेर काढले. यासह टीम इंडियाने सलग तिसऱ्यांदा (याआधी २०१३ आणि २०१७ मध्ये) या स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवून हॅट्रिक साधली.

## संपादकीय



### नदी पुनरुज्जीवन...

गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर पुण्यातील मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना राबविण्याचा मानस पुणे महापालिकेत २०१७ मध्ये सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पक्षाने व्यक्त केला आणि नंतर प्रत्यक्ष कामही सुरू झाले. तब्बत ४ हजार ७२७ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेवर अनेक आक्षेप घेतले जात आहेत. मात्र, त्यानंतरही भाजप आणि महापालिका प्रशासनाची या योजनेसाठी आग्रही भूमिका कायम आहे. यासाठीचे सर्व पैसे करदात्यांच्या खिशातून खर्च होणार आहेत. त्यामुळे ही योजना नेमकी काय आहे, तिचे दूरगामी परिणाम काय होतील, या सर्व प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे शोधणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. एके काळी हिरव्यागार टेकड्या, स्वच्छ वाहत्या नद्या आणि समृद्ध जैववैविध्यासाठी ओळखले जाणारे पुणे अलीकडच्या काही वर्षांत पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील झाले आहे. मोठ्या प्रमाणावरील नागरीकरणात नद्या, नाले आणि ओढ्यांच्या पात्रांवर अतिक्रमण झाले आहे. नद्यांमधील जैववैविध्य नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. टेकड्या उजाड झाल्या आहेत. नद्यांची वहनक्षमता कमी झाल्याने आणि शहराची संपत्ती म्हणून नद्यांकडे पाहिले जात नसल्याने नद्यांचे संवर्धन, पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आणि त्यातूनच पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीकाठांच्या संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरणाची योजना पुढे आली. या योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. मात्र हा प्रश्न केवळ आर्थिक नाही. तर कधीही भरून न निघणाऱ्या पर्यावरणाच्या हानीचाही आहे. तो नद्यांच्या काठांपुरता सीमित नसून, तेथून दूर राहणाऱ्यांच्या घरांच्या अस्तित्वाचाही आहे.

**नद्यांची सद्या:स्थिती काय?**

शहर परिसरातून मुठा, मुळा, पवना, रामनदी आणि देवनदी या नद्या वाहतात. या पाचही नद्यांचा संगम होऊन मुळा-मुठा ही एक नदी बाहेर पडते. अनेक घटकांमुळे या नद्यांचा ऱ्हास होत आहे. पूरनियंत्रण, नद्यांची स्वच्छता, त्यांचे पुनरुज्जीवन आणि नद्यांचे आणि नागरिकांचे नाते जोडणे या उद्देशाने मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण ही योजना राबविण्यात येत आहे, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मुळा, मुठा आणि मुळा-मुठा या ४४ किलोमीटर लांबीच्या नद्यांचे पुनरुज्जीवन होईल, असा दावाही करण्यात येत आहे.

**समस्या काय?**


मुबलक पाण्यामुळे शहराची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मात्र याला दुसरी बाजूही आहे. २०१९ मध्ये आंबिल ओढ्याला व नद्यांना आलेल्या पुराने अवघ्या काही तासांत शेकडो घरे उद्ध्वस्त झाली. कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊन २५ निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागले. असाच अनुभव पुणेकरांनी २०२४ सालीही घेतला. हे असे का होत आहे? पूर्वीदेखील असेच होत होते का? भविष्यातही सातत्याने पूरपरिस्थिती निर्माण होणार का? याला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने पुढे येत आहेत. मात्र, खरा प्रश्न आहे तो शास्त्रशुद्ध उत्तरे कधी शोधली जाणार हा.

मुळा-मुठा नदीमुळे पाच वेगेवगेळ्या पाणलोट क्षेत्रांतून पुण्यात पाणी येते. मात्र शहराची भौगोलिक रचना 'बशी'सारखी असल्याने मुसळधार पावसात चहुबाजूंनी शहराच्या मध्यभागाकडे वेगाने पाणी येते व पूरपरिस्थिती निर्माण होते. या नद्यांवर पुण्याच्या ऊर्ध्व बाजूला सात लहान-मोठी धरणे आहेत आणि ती अंतराच्या दृष्टीने एकमेकांपासून फारशी लांब नाहीत. या सर्व नद्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या पाणलोट क्षेत्रांचे स्वरूप. ही क्षेत्रे डोंगर-दऱ्यांची आणि तीव्र उतारांची आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी खूप वेगाने नदी किंवा ओढ्यांमध्ये येते. रामनदी आणि आंबिल ओढ्याच्या पुरांनी हा प्रकार सप्रमाण सिद्ध केला आहे.

'दी एनर्जी अँण्ड रिसोर्सेस इन्सिट्यूट' (टेरी) या संस्थेने २०१४ मध्ये राज्य शासनाला 'महाराष्ट्र स्टेट अडॉप्शन ॲक्शन प्लॅन' नावाचा अहवाल दिला आहे. या अहवालात 'भविष्यात पुण्यात पावसाचे प्रमाण ३७.५० टक्के वाढेल आणि मोठ्या प्रमाणावर ढगफुटी होईल,' असा स्पष्ट अंदाज वर्तविण्यात आला आहे. गेल्या २०-२५ वर्षांत शहरातील नद्यांची अवस्था भीषण झाली आहे. लोकसंख्या वाढत असल्याने सांडपाणी मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. मात्र महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता आणि कार्यक्षमता तोकडी पडत आहे. औद्योगिक प्रदूषणाची भर पडत आहे. नद्यांची वहन क्षमता कमी झाली आहे. निळ्या आणि लाल रंगांत दर्शविलेल्या निषिद्ध क्षेत्रांतही मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली आहेत.

## मातृभाषेतून शिक्षण ही काळाची गरज !!

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती



व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## तुळजाई प्रतिष्ठान राज्य शासनाचा 'बालस्नेही' पुरस्काराने सन्मानित

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.०४, कळंब (धाराशिव) :** माणुसकीची सावली बनून निराधार मुलींचे जीवन उजळवणाऱ्या तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था, पानगाव ता. कळंब, जि. धाराशिव या संस्थेचा सलग दुसऱ्या वर्षी राज्य शासनाच्या बालस्नेही पुरस्कार २०२४ ने सन्मान करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या वतीने दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार उत्कृष्ट विशेषगृह या नामांकन प्रकारात छत्रपती संभाजी नगर विभागातून तुळजाई प्रतिष्ठानला आदिती तटकरे मंत्री, महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य, मेघना बोर्डीकर राज्य मंत्री, महिला व बालविकास, डॉ. पंकज भोयर राज्यमंत्री, गृहनिर्माण, मा. आमदार मनिषा कायंदे, डॉ. प्रशांत नारनवरे राज्यपालांचे खाजगी सचिव, आमदार संजय केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

३ मार्च २०२५ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट येथे दुपारी १ वाजता पार पडलेल्या भव्य सोहळ्यात या पुरस्काराने प्रतिष्ठानचा गौरव करण्यात आला. समाजातील दुर्लक्षित, मानसिकदृष्ट्या अस्थिर आणि बेवारस




स्थितीत सापडलेल्या १२१ अनाथ मुलींच्या संगोपन, शिक्षण आणि पुनर्वसनासाठी अहोरात्र समर्पित असलेल्या या संस्थेचे कार्य खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

सलग दुसऱ्या वर्षी मिळालेल्या या प्रतिष्ठित पुरस्कारामुळे संस्थेच्या समर्पित कार्याची राज्यस्तरीय पातळीवर दखल घेतली गेली आहे. या सन्मानाने तुळजाई प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले असून, भविष्यातही अधिक जोमाने कार्य करण्यासाठी योगदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.यावेळी पुरस्कार स्वीकारताना संस्था सचिव श्री शहाजी चव्हाण, गुरूनाथ थोडसरे, रेणुका कुदळे, सोनाली मिटकरी व व्यंकट देवकर, जिल्हा परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय धाराशिव इ. उपस्थित होते.

### राजी नामा ..

येतोआदेश वरतूनि
देरे बाबा राजीनामा
नाईलाज अगतिक
राजी नसे जरीनामा

निदर्शने न्आंदोलने
विरोधी एकत्र जमा
उद्रेक उसळे मनाचा
जोरा करावा हंगामा

सबुरीचा देतीसल्ला
वाटपहा जरासे दमा
अस्वस्थ होती अति
उफाळूपाहे अस्थमा

भक्तमंडळी लाडकी
भोवताली लवाजमा
व्यवस्था व्यवस्थित
करेआधीखातरजमा

ऑल राईट होई सर्व
करूनका मुळी तमा
एकवाद मिटलाचला
एका विषया खातमा

काही जण संतुष्टती
आक्रोश येतो कामा
वर्णीलागे दुस-याची
एक बंगला रिकामा

आला बुवा उन्हाळा
वाढूलागे पुन्हाउष्मा
बदलली समीकरणे
राजीनामा येईकामा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी तरीही स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणतात,हे चाल्लय तरी काय!

सध्या सर्वोच्च न्यायालयात दोषी राजकारण्यांवर आजीवन निवडणूक लढण्यावर बंदी असावी याकरीता जनहित याचिकेवर सुनवायी सुरू आहे.देशाच्या १८ व्या लोकसभेत निवडून आलेले ५४३ खासदारांपैकी २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत.यात ३९ टक्के मंत्री गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत, तर २८ खासदारांना वेगवेगळ्या कोर्टाने गुन्हेगार घोषित केले आहे. यातील १९ खासदारांवर हत्या आणि महिला अत्याचारांसारखे अत्यंत गंभीर आरोप आहेत,तरीही मोठ्या डौलाने सांगतात की आम्ही समाजसेवक,लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी आहोत.ही आश्चर्य व्यक्त करणारी व धक्कादायक बाब आहे. देशाची १४० कोटी जनसंख्या आहे त्यातील जर ४६ टक्के खासदार गुन्हेगार प्रकरणामध्ये दोषी असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे! सध्याच्या परिस्थितीत २५१ खासदार दोषी आहेत म्हणजेच हे देशाच्या ६४ कोटी जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहेत.

हीबाब स्वतंत्र भारतासाठी काळीमा फासणारी नाही का? गुन्हेगारीतुन आलेले खासदार जर देशाचे प्रतिनिधित्व करीत असेल तर हे देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.यामुळे देशाच्या लोकांना चिंता आहे की, देशाचे ४६ टक्के गुन्हेगारीने दोषी असलेले खासदार सर्वसामान्यांना खरोखरच न्याय देऊ शकेल काय?हा मोठा प्रश्न आज १४० कोटी जनते समोर उपस्थित होतो. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, अशा खासदारांच्या क्षेत्रात गुन्हेगारीला जास्त वाव दिला तर जात नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो.ज्या ठिकाणी गुन्हेगारीला चालना मिळते अशा क्षेत्रात गुन्हेगार खासदार निवडून आले असावेत असाही प्रश्न निर्माण होतो. परंतु अशा लोकसभा क्षेत्रातील सर्वसामान्यांचे कीती हालबेहाल व अन्याय होत असतील हे सांगणे मात्र अत्यंत कठीण आहे.२०१९ मध्ये गुन्हेगारीने बरबटलेले खासदार ४३ टक्के होते आता ती संख्या वाढुन २०२४ मध्ये ४६ टक्यावर येवून पोहोचली आहे.तरीही स्वतःला स्वच्छ, निस्वार्थी आणि चांगल्या प्रतिमेचे समजतात ही अत्यंत गंभीर बाब आहे.दोषी राजकारणी दोषमुक्त झाले असले तरी त्यांच्या रक्तात दोष अवश्य दिसून येईल. त्यामुळे दोषी राजकारण्यांना राजकारणातुन जळामुळासकट बाहेर करने अत्यंत गरजेचे आहे. गुन्हेगारीमध्ये दोषी राजकारण्यांचा आपण जर देशातील राज्यांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर १० राज्यातील तब्बल ५० टक्के खासदार गुन्हेगार क्षेत्रातुन आले आहेत अशाने गुन्हेगारीवर कसाकाय आळा बसेल हाही गहन आणि गंभीर विषय निर्माण होतो.

देशाला गुन्हेगारीतुन मुक्त करायचे असेल तर सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांचा प्रवेश वाढला तर देशात हजारोंच्या संख्येने वाल्मिक कराड सारखे गुन्हेगार निर्माण होतील व प्रशासनाला गुन्हेगारीवर आळा घालण्यास मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. या संपूर्ण बाबी लक्षात घेता सरकारने कठोर पाऊल उचलने गरजेचे आहे.कारण गुन्हेगारांची परिभाषा गुन्हेगारीमध्येच गणल्या गेली पाहिजे व त्यांची जागा त्यांना दाखविली पाहिजे असे मला वाटते. स्वच्छ व निर्मळ प्रशासन अंमलात आणण्यासाठी सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर कठोर कारवाई करून त्यांना लोकप्रतिनिधी पदावरून हटविणे गरजेचे आहे. कारण अशा प्रवृत्तींच्या लोकांनी जबाबदार पदावर पदावर रहाने म्हणजे देशाचा अपमान समजल्या जाईल.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## लासलगाव उपविभाग कार्यालयात लाईनमन दिवस साजरा..

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लासलगाव उपविभाग येथे दि.४ मार्च रोजी राष्ट्रीय लाईनमन दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाची प्रेरणा ही माननीय कार्यकारी अभियंता चांदवड विभागीय कार्यालय केशव माळी यांच्या संकल्पनेतून व चांदवड विभागीय कार्यालयाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनील रहिंज यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून विद्युत निरीक्षक कार्यालयातील सहाय्यक अभियंता



चेतन चौधरी, सचिन पाटील, लासलगाव उपविभागीय कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता ज्ञानेश बागुल यांनी देखील तंत्र कर्मचाऱ्यांना लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सारोळा कक्षाचे सहाय्यक अभियंता निकम, विंचूर कक्षाचे काकड, देवगाव कक्षाचे राजपूत, लासलगाव शहर कक्षाचे साळवे हे उपस्थित होते. या प्रसंगी सचिन पाटील साहेब यांनी विना अपघाता विषयी मार्गदर्शन केले, तसेच सुनील रहींज यांनी अध्यक्षीय भाषणात सुरक्षा विषयक साधनांचा वापर करून विना अपघात सेवा कशी करावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन, तसेच काही तांत्रिक कर्मचाऱ्यांनी विना अपघात सेवा केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश जोशी चांदवड विभागीय कार्यालय यांनी केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड यांच्यामार्फत विविध पुरस्कार जाहीर

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०४, नवी मुंबई :** नवी मुंबई येथील ग्लोबल गोल्ड टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड तुर्फे छत्रपती. शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित राष्ट्रस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र रत्न/आदर्श शिक्षक/महाराष्ट्र रत्न पुरस्कार रविवार, दि.०९ मार्च २०२५ रोजी आगरी समाज मंगल कार्यालय, कामोठे येथे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सपन्न होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नयना आपटे पद्मश्री भारत सरकार सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेत्री, साक्षी सुबोध नाईक अभिनेत्री रत्ना खंडेलवाल सहाय्यक पोलीस निरीक्षक रामजीत (जितु) महादेव गुप्ता (मुख्य तपासी अधिकारी मुंबई) यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून ९३० अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून ५० विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

GLOBAL GOLD TALENT BOOK OF RECORD

पुरस्कार स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आकर्षक मेडल व पुस्तक देवून सन्मानित करण्यात येणार आहे. असे आयोजक संस्थेच्या संचालिका मेघा महाजन यांनी सांगितले. पुढील पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या नावांची घोषणा यावेळी बोलतांना त्यांनी केली. छ.शिवाजी महाराज महाराष्ट्र रत्न पुरस्कार हा निलेश पवार, आरती धनवडे, अर्पणा देशमुख, शारदा राणा, प्रकाश माळी, रमेश झगडे, राजेश घायल, अशोक पाटील,सोनल शुक्ल, काश्मिरा अश्विन शुक्ल, दादा खांडेकर, विजया शं.झाडे, पुष्पलता गावंडे, जगदीश खंडारे, अजय जिरापुरे, संतोष सावंत, प्रशांत शिरोडे, महादेव गायकर तसेच छ.शिवाजी महाराज महाराष्ट्र गौरव पुरस्कार हा हनुमंतराव जगताप, छाया पायमोडे, युवराज जाधव, विजय पाटील, बिजाश्री राय, राजू बिरारी आणि छ.शिवाजी महाराज आदर्श शिक्षक पुरस्कार हा सचिन साळवी, रवींद्र अहिरराव, पठाण शफीक, स्वीटी खरात, प्रदीप सूर्यवंशी, मोहमद नदीम, सरिता वागदे, चंद्रशेखर साळवे, विजय वाघेला. सतिश मिश्रा. नसीम कुरणे. सोनल भालेकर, सुजाता सूर्यवंशी, साक्षी भोईटे, काजल सुर्वे, ज्योती सनाये, पूनम दीक्षित, स्नेहा कर्णिक, पांडुरंग नाझरे, अनंत सावंत, अफरोज खान हे आहेत.

## लवकरच डोंबिवली ठाणे बस सेवा सुरू होणार




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०४, डोंबिवली (ठाणे) :** मध्ये रेल्वेतील सर्वात जास्त गर्दीचे डोंबिवली रेल्वे स्थानक आहे. वाढत्या गर्दीवर रेल्वे प्रवाशांसाठी रेल्वे गाडी वाढविण्यात आल्या असल्या तरी गर्दीत वाढ होत असताना दिसते. यावर कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश मोरे यांनी विशेष लक्ष देत पालिका आयुक्तांची भेट घेऊन डोंबिवली ते ठाणे बससेवा सुरु करण्याबाबत चर्चा केली. पालिका आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेत बससेवा सुरु करण्याचे आश्वासन दिले असल्याचे याबाबत आमदार मोरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, डोंबिवलीकरांना ठाणे शहरात जाण्याकरता रेल्वेच्या गर्दीतून जाण्याची गरज भासणार नाही.डोंबिवली पश्चिम कडील शास्त्रीनगर रुग्णालयाजवळ ते ठाणे आणि दोन टाकी ते ठाणे शहर असा परिवहन बससेवा सुरु होणार आहे.आपल्या मागणीचा विचार करून बससेवा सुरु करणार असल्याने पालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड यांच आभार मानतो. डोंबिवली ते ठाणे अशी बससेवा सुरु होणार असल्याने आता ठाणे शहरा पर्यतचा प्रवास सुखकर होणार आहे. तिकीट दराबाबत अद्याप निश्चित झाले नाही.

दरम्यान सकाळच्या वेळी डोंबिवली रेल्वे स्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. आजवर डोंबिवली ते ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे गाडीतून पडून अनेक अपघात झाले.मात्र आता डोंबिवली ते ठाणे ही परिवहन बससेवा सुरु होणार असल्याने डोंबिवली, कोपर, दिवा, मुंब्रा, कळवा आणि ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान प्रवाशांची संख्या काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे या स्थानकादरम्यान रेल्वे अपघातांवर नियंत्रण येईल असे डोंबिवलीकर म्हणत आहे.

## महानगरपालिका मधील स्थानिक संस्था कर विभाग कायम बंद होणार

**अक्षराज : चंदन सिंग**

**दि.०४, मुंबई :** महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर विभाग बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी नगर विकास विभा रीगाद्वारे सर्व महानगरपालिका आयुक्तांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. या निर्देशांनुसार, ३० एप्रिल २०२५ पासून महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर विभाग कायमचा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्थानिक संस्था कर रद्द करण्यामागील कारणे २०१७ साली वस्तू व सेवा कर (ऋडढ) लागू झाल्यामुळे संपूर्ण देशभरातील कर प्रणालीत मोठा बदल करण्यात आला. यानंतर, अनेक स्थानिक कर, जसे की जकात व स्थानिक संस्था कर (ङइढ), हटवण्यात आले. मात्र, काही ठिकाणी स्थानिक संस्था कराशी संबंधित विभाग अस्तित्वात राहिले. त्यामुळे त्यांचे कार्यकाळानंतरही काही प्रशासकीय जबाबदाऱ्या उरल्या होत्या.

नवीन निर्णयाचा प्रभाव १) महानगरपालिकांचे प्रशासन अधिक सुलभ होईल – स्थानिक संस्था कर विभाग कार्यरत राहिल्यामुळे अनावश्यक प्रशासकीय भार वाढला होता. हा विभाग बंद झाल्यानंतर प्रशासन अधिक कार्यक्षम होईल. २) शासनाच्या वित्तीय धोरणांची अंमलबजावणी २०१७ पासून ऋडढ लागू झाल्यानंतर स्थानिक संस्था कराची आवश्यकता संपली. त्यामुळे शासनाच्या एकसंध कर प्रणालीच्या धोरणानुसार ही पावले उचलण्यात आली आहेत. ३) महानगरपालिकांच्या उत्पन्न व्यवस्थापनात सुधारणा – स्थानिक संस्था कराऐवजी ऋडढ मार्फत मिळणाऱ्या निधीवर भर देण्यात येईल. महानगरपालिकांसाठी पुढील कार्यवाही सर्व महानगरपालिकांनी ३० एप्रिल २०२५ पर्यंत स्थानिक संस्था कर विभाग बंद करण्याच्या कार्यवाहीची पूर्तता करावी. तसेच, ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाला अहवाल सादर करावा. शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी नगर विकास विभागाचे उप सचिव श्रीकांत आंडगे यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी करण्यात आला आहे. तसेच, मुख्य सचिव, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव, आणि प्रधान सचिव (नवि-२) यांना याबाबतची प्रत पाठवण्यात आली आहे. निष्कर्ष स्थानिक संस्था कर विभाग बंद करण्याचा हा निर्णय शासनाच्या कर सुधारणा धोरणाचा एक भाग आहे. यामुळे महानगरपालिकांचे प्रशासन अधिक सुटसुटीत होईल आणि ऋडढ प्रणाली अधिक प्रभावीपणे लागू करता येईल.

## गोमांस विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई; एकास अटक तर एक आरोपी फरार

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०४, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी पोलीस ठाणे हद्दीतील कुरेशीगल्ली मुनवर मशीदजवळ आरोपींच्या राहत्या घरासमोरील ओसरीमध्ये मंगळवार, दिनांक ०४ मार्च २०२५ रोजी ११:३० वाजताच्या सुमारास खुलेआम दोन व्यक्तींनी बेकायदा गोवंश मास विक्री आणि कत्तल करीत असताना रंगेहात पकडले. त्यांच्याकडून एकूण किमतीमध्ये मुद्धेमाल २४०० रुपयांचे गोमांस जप्त करून दोन आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर -३३/२०२५कलम ३२५, ३(५)इछड व सह कलम ५, ५(क), ९, ९(अ), १०प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, सुधारणा अधिनियम १९९५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम २०१५तसेच कलम ४,२५ शस्त्र अधिनियम १९५९अंतर्गत दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस हवालदार शंकर लालू चव्हाण यांच्या फिर्यादीवरून याबद्दल सविस्तर माहिती अशी की, आरोपी नामे शाहिद इब्राहिम कुरेशी वय २६ वर्ष आरोपी नामे इब्राहिम करीम कुरेशी दोघे राहणार कुरेशी गल्ली, मुनवर मशीदजवळ कुंडलवाडी येथे त्यांच्या राहत्या घरासमोरील ओसरीमध्ये दि.०४ मार्च २०२५ रोजी ११:३० वाजताच्या सुमारास १ हजार २०० रुपये किमतीचे गोवंशी जातीचे मांस व हाडे वजन ५ किलो बाजारभावानुसार किंमत २४० रुपये प्रतिकिलो व गोवंश कापण्यासाठी वापरलेले दोन मोठे लोखंडी सुरे, लोखंडी लांब वजन काटा, लोखंडी मोजमापे, प्लास्टिकचे टोपले असे एकूण किमतीमध्ये मुद्धेमाल २ हजार ४०० रुपये जप्त करण्यात आला आहे.

यातील वरील नमूद दोन्ही आरोपीने संगणमत करून आपल्या घरातील ओसरीमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंश हत्या बंदी कायदा लागू आहे. याची आरोपीस माहिती असतांना देखील जाणीवपूर्वक या दोन आरोपीने गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून त्याची अवैध विक्री करीत असताना वरील वर्णनाचे गोमांस जातीचे मांस व मुद्धेमाल स्वतःच्या ताब्यात बाळगून मिळून आले त्यातील एक आरोपी पोलिसांना पाहून पळून गेला तर, एकास अटक करण्यात आली गुन्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी भेट दिली व पुढील तपास पोलीस हवालदार शेख गफूर हे करीत आहेत.

## निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्याची संधी आमसभेच्या माध्यमातून जनतेला मिळाली

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** पंढरपुर येथे तब्बल८ वर्षानंतर पार पडलेल्या आमसभेवरून समाज माध्यमांवर आमसभेच्या अध्यक्ष विरोधात आणि उपस्थित आमदारांविरोधात परिचारक समर्थकांकडून आक्षेप नोंदवण्यात आले होते. यानंतर सोमवारी माजी आमदार प्रशांत परिचारक समर्थकांनी पत्रकार परिषद घेऊन आमसभेचा निषेध करत आ.अभिजीत पाटील, आ.राजू खरे यांच्यावर केलेल्या आरोपानंतर मंगळवारी आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी पत्रकार परिषद घेऊन परिचारक समर्थकांचा चांगला समाचार घेतला.



आमदार अभिजीत पाटील समर्थकांच्या पार पडलेल्या पत्रकार परिषदेत मागील अनेक वर्षांपासून सामान्य नागरिकांना प्रश्न मांडण्यासाठी आमसभा घेण्यात आली नाही. ८ वर्षानंतर आमसभा घेऊन आमदार अभिजीत पाटील यांनी सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न मांडण्याची संधी दिली.सदर आमसभा जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने आमसभेचा अध्यक्ष निवडून नियमानुसार घेण्यात आली. आमसभेसाठी ४० हुन अधिक खात्याचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये सर्वसामान्य नागरिकांना अनेक प्रश्न मार्गी लागल्यामुळे आमसभेने चारही आमदारांचा अभिनंदनाचा ठराव मांडला.

मात्र परिचारक समर्थकांनी आपले अस्तित्व संपत चालल्याने आमसभेचा निषेध करून आपले राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण होत असल्याने पोटसुळ उठला असल्याचे दाखवून दिले आहे. आधी त्यांनी मागील २५ वर्षात काय काम केले ते सांगावे. त्यांनी संस्थांची वाट लावली असल्याची टीका आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी केली.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, किरणराज घाडगे, संदीप मांडवे, नागेश गंगेकर, अनिता पवार, अमर सूर्यवंशी, प्रशांत शिंदे, तुकाराम मस्के, महादेव तळेकर, गणेश ननवरे, विशाल आर्वे उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले म्हणाले की, ८ वर्षानंतर शासकीय नियमानुसार आमसभा पार पडली. यामध्ये ग्रामीण आणि शहरातील प्रश्न मांडण्यात आले. जास्तीत जास्त ग्रामीण भागातील नागरिकांना प्रश्न मांडण्याची संधी दिली गेली. महिलांना ही प्रश्न मांडण्याची संधी मिळाली. यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले. शहरात लवकरच नगरपालिकेचे दवाखाने, सर्व शाळा सुरू होतील. पाण्यावर अधिकचा टॅक्स लागणार नाही.

या आमसभेत नागरिकांसाठी ६ कोटी रुपयांचा काय झाला. मात्र शहरातील सुरू असलेल्या ११ रस्त्यांबाबत प्रश्न उपस्थित केल्याने आणि आपले राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण होऊ लागल्याने परिचारक समर्थकांनी अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आमसभेचा निषेध केला आहे. असा आरोप करत मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासक असल्याने त्यांना बोलण्याचा अधिकार नाही असा सवाल उपस्थित करत त्यांनी १८० कोटी नगरपालिकेचे वार्षिक बजेट असताना यावर नागरिकांनी बोलू नये का? शहरातील नागरिक कर भरत आहेत. मात्र अनेक वर्षांपासून शहरातील नगरपालिकेचे दवाखाने बंद, बागा बंद, क्रीडांगण नाहीत. रस्त्याची दुरावस्था झाली आहे, शहरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. नगरपालिकेवर २५ वर्ष परिचारक पार्टीची सत्ता असताना काय केले ते सांगा असा प्रतिसावाल केला. यावेळी बोलताना किरण घाडगे यांनी नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत आहे.

शहरात सुरू असलेल्या कामांमध्ये कमिशन जास्त घेतले जात असल्याने निकृष्ट दर्जाचे काम होत आहेत. एकाच ठेकेदाराला वारंवार काम दिले जात आहे. असा आरोप करत. यावर बोलण्याचा अधिकार नाही का? असा सवाल उपस्थित केला. याबाबत शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी धाडस दाखवून आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहरात आमसभा घ्यावी अशी मागणी केली.

यावेळी संदीप मांडवे म्हणाले की, मालकशाही उध्वस्त करण्याच्या उद्देशाने आणि नगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आमसभा घेण्यात आली नव्हती तर ती जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी होती. मात्र विरोधक काहीही बोलत आहेत. एक महिन्यांपूर्वी आमसभा घेण्याचे आदेश अधिकाऱ्यांना आले होते. तरी देखील नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांना उत्तर देता आले नाही. काही अधिकारी गैरहजर होते. याचा निषेध विरोधकांनी केला पाहिजे होता. मात्र ते अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत.

आ.अभिजीत पाटील यांनी पंढरपूर तालुक्याशी संबंधित चारही आमदारांना एकत्र आणल्याने त्यांना दुःख झाले असेल अशी मार्मिक टीका करत आम्ही कोणालाही टार्गेट करत नाही परंतु आमच्या नेत्यांवर खालच्या भाषेत टीका केली तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा दिला.

यावेळी विठ्ठलचे संचालक तुकाराम मस्के म्हणाले की ऊस दरावर प्रश्न विचारण्यात आले. आमसभेचा निषेध करण्यात आला. मात्र विरोधकांना माहीत नाही की आ. अभिजीत पाटील यांनी जिल्ह्यात सर्वात जास्त आत्तापर्यंत गळीत हंगामाचे २ हजार ८०३ रुपये दर सर्व शेतकऱ्यांना देण्याचे काम केले आहे. पुढील काळात सर्व जाहीर केलेला दर मिळेल. मात्र परिचारकांच्या भोवती साईड हिरोची भूमिका बजावणारे उगाच टीवटीव करत असल्याचे टीका केली.

## जिल्हा व्यापारी महासंघ, लघुउद्योग भारतीच्या वतीने नूतन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०४, धाराशिव :** धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघ आणि लघुउद्योग भारती संघटनेच्या वतीने नूतन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी व्यापाऱ्यांना संघाकडून देण्यात येणाऱ्या सुविधा व त्यांच्या समस्या याबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी कीर्ती पुजार यांनी व्यापारी संघाचे आणि लघुउद्योग भारतीच्या कार्याचे कौतुक करून व्यापाऱ्यांना येत असलेल्या समस्याबाबत लवकरच एक बैठक आयोजित करून कायमस्वरूपी उपाययोजना करणे बाबत आश्वासित केले.

तत्पूर्वी व्यापारी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी पुजार यांचा फुलांची कुंडी देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी जिल्हा धाराशिव व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव, सचिव महेश वडगावकर, संजय मोदाणी, संघटन सचिव अभिलाष लोमटे, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष धनाजी आनंदे, शाम बजाज, राजाभाऊ काळे, बापु सुर्यवंशी, अविनाश काळे, नितीन फंड, विशाल थोरात, संग्राम शिंदे,अझहर खान, अभयसिंह राजेनिंबाळकर, सराफ सुवर्णकार अध्यक्ष कपिल शर्मा, नितीन नायर, सुभाष शेट्टी, पी.आर. काळे, संजय देशमाने, राजु जानवाडकर, अतुल अजमेरा, दशरथ धुमाळ, राजाभाऊ आवटे सी.ए सचिन बांगड उपस्थित होते.



## जलजीवन मिशनच्या अनागोंदी कारभारा विरोधात आमरण उपोषण

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०३, ठाणे :** ग्रामीण भागातील पाणीटंचाई आणि जलजीवन मिशन योजनेतील अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ आजपासून ठाणे जिल्हा परिषद कार्यालयासमोर माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या वतीने राज्य उपाध्यक्ष शंकर अनंता वडवले यांच्या नेतृत्वाखाली व संस्थापक सुभाष बसवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या उपोषणाला सुरुवात झाली. ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून कोट्यवधी रुपये खर्च करून योजना राबवल्या जात आहेत. मात्र, प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये अद्याप ही पाणी उपलब्ध नाही. योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत धरणे उशाला नि कोरड घशाला अशी स्थिती निर्माण झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.




**मुख्य मागण्या** - १) जलजीवन मिशन योजनेची सखोल चौकशी व्हावी. २) सदोष आणि अपूर्ण योजना त्वरित पूर्ण करून ग्रामपंचायतींना हस्तांतरित कराव्यात. ३) चुकीचे अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. ४) गावागावात पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या नागरिकांना त्वरित पुरेसा पाणीपुरवठा करावा.

पाणी नाही, तर जगणे नाही या घोषणांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होत आहेत. स्थलांतरित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा, शिक्षण आणि आरोग्यावर होणारे परिणाम, भ्रष्टाचाराचे धागेदोरे यासंबंधी शासनाला जागे करण्यासाठी हे उपोषण सुरू झाले आहे. पाणी टंचाईच्या प्रश्नावर प्रशासन कोणती भूमिका घेणार आणि सरकार कसा प्रतिसाद देणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात कातकरी कुटुंबांचे सर्वेक्षण युध्द पातळीवर सुरू

## १२ हजार २३७ घरकुलासाठी पात्र कातकरी कुटुंबियांना मिळेल पक्के घर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, ठाणे :** भारताचे प्रधानमंत्री यांनी जनजाती गौरव दिनानिमित्त प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान सुरू केले आहे. देशातील ७५ विशेषत: असुरक्षित आदिवासी गटांचा विकास करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

त्याच धर्तीवर ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड, शहापूर व कल्याण तालुक्यातील वर्ष २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत आदिम जमातीतील सर्वेक्षण १३ हजार ०३२ कुटुंबांचे करण्यात आले असून १२ हजार २३७ पात्र घरकुल लाभार्थी संख्या तर घरकुल मंजूर लाभार्थी ६ हजार ४६२ संख्या आहे. कातकरी कुटुंबांना घरकुल देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत मिशन मोडवर कामकाज करण्यात येत आहे.

प्रथमतः अंबरनाथ, भिंवडी, मुरबाड तालुक्यातील केवळ ३५ ग्रामपंचायतींचा प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत समावेश करण्यात आला होता. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडील पाठपुराव्याने व जिल्ह्यातील आदिवासी संघटनांकडून वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार यांच्या विशेष प्रयत्नांनी केंद्र शासनाकडील सर्वेक्षणाचे लिंक पुन्हा सुरू (रीओपन) करुन देण्यात आली असून कातकरी कुटुंब या लाभापासून वंचित राहू नये, त्याअनुषंगाने सद्यस्थितीत ठाणे ग्रामीण भागामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेक्षणाचे कामकाज वेगाने सुरू आहे. आज अखेर १३ हजार ०३२ कुटुंबांचा सर्व्हे पुर्ण झाला असून १२ हजार २३७ लाभार्थी पात्र झाले असून ९ हजार ६८७ लाभार्थ्यांची नोंदणी (रजिस्ट्रेशन) पुर्ण करण्यात आली आहे, तर ६ हजार ४६२ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे. कोणतेही कुटुंब सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही याची विशेष दक्षता घेण्याबाबत सर्व तालुकास्तरीय यंत्रणेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना दिले आहेत. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये सर्वेक्षण युध्द पातळीवर सुरू असून सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे.

मुलभूत सुविधांसह पक्की घरे बांधण्यासाठी प्रती घरकुल २.३९ लाख (घरकुल अनुदान २.०० लाख, रु. १२ हजार रुपये/- एसबीएम-जी आणि मनरेगा अंतर्गत ९०/९५ दिवसांचे अकुशल वेतन रु.२७ हजार रुपये अंदाजे) अशी तरतूद केलेली असून आदिम जमातीतील पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विशेष प्रयत्न यावर्षी करण्यात आले आहे, अशी माहिती प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली.



भारत सरकारकडून प्राप्त आदर्श कार्यपध्दतीनुसार ठाणे जिल्ह्यात एकुण पीव्हीटीजी अंतर्गत येणारी लोकसंख्या ५५ हजार ०७७ असून, पीव्हीटीजी एचएच (कुटुंब संख्या)- २५ हजार ३५७ आहेत. तसेच पीव्हीटीजी एचएचएस (कच्चे घर असणारी कुटुंब संख्या)- ही ६ हजार ९०५ इतकी दर्शविण्यात आली होती परंतु आज अखेर उद्दिष्टापेक्षा जास्त १३ हजार ०३२ कुटुंबांचे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे. विविध श्रमजीवी संघटना तसेच इतर संघटनांच्या मदतीने कामकाज करण्यासाठी सोईचे झाल्यामुळे या कामाची दखल विविध स्तरावर घेण्यात येत आहे.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत अंबरनाथ तालुक्यातील सर्वेक्षण ९४१ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ८६५ तर घरकुल मंजूर लाभार्थी ५५२, भिवंडी तालुक्यातील सर्वेक्षण ४ हजार १०१ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ३ हजार ९२१ तर घरकुल मंजूर लाभार्थी १ हजार ८२९, मुरबाड तालुक्यातील सर्वेक्षण २ हजार ८९७ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या २ हजार ५२२ तर घरकुल मंजूर लाभार्थी १ हजार ३४४, शहापूर तालुक्यातील सर्वेक्षण ४ हजार ०७९ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ४५२ तर घरकुल मंजूर लाभार्थी २ हजार ४०५, कल्याण तालुक्यातील सर्वेक्षण १ हजार ०१४ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ८७७ तर घरकुल मंजूर लाभार्थी ३३२ आहेत. असे एकूण ठाणे जिल्ह्यात सर्वेक्षण १३ हजार ०३२ कुटुंबांचे करण्यात आले असून १२ हजार २३७ पात्र घरकुल लाभार्थी संख्या तर घरकुल मंजूर लाभार्थी ६ हजार ४६२ संख्या आहे. कातकरी कुटुंबीयांना पक्के घरकुल मिळवुन देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत असून विविध श्रमजीवी संघटना तसेच इतर सामाजिक संघटनाच्या पुढाकारामुळे प्रशासकीय कामकाज करण्यासाठी मोलाचे योगदान मिळाले आहे. जिल्ह्यातील पात्र घरकुल लाभार्थी १२ हजार २३७ यांना हक्काचे पक्के घर मिळणार असल्याने विविध स्तरावरून याची दक्षता घेण्यात येत आहे.

# जिवनदीप खर्डी महाविद्यालयात एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०४, शहापूर (ठाणे) :** खर्डी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि आयक्युएसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिकिकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम याविषयावर 'एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन मंगळवारी करण्यात होते.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे उदघाटन मुंबई विद्यापीठाच्या मानव्य आणि सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.अनिल सिंग यांच्या हस्ते झाले. यावेळी चर्चासत्राचे बीजभाषक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. सतीश बडवे, जी. शै. सं चे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे उपस्थित होते.




चर्चासत्रात मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद कुमरे,डॉ. वासुदेव वले, डॉ. विलास गायकर, डॉ. ताहेर पठाण तसेच या चर्चासत्रात जी. शै. सं चे संचालक प्रशांत घोडविंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे उपस्थित होते. बदल हे जागतिकिकरणाचे सूत्र आहे तसेच जागतिकिकरणामुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रात झालेल्या बदलाचा चांगला व वाईट परिणाम.'याविषयी मत बिजभाषक डॉ. सतीश बडवे यांनी व्यक्त केले. मुंबई विदयापीठचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद कुमरे यांनी, जागतिकिकरणामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पडलेला सकारात्मक व नकारात्मक बदलाची चर्चा केली. डॉ. वासुदेव वले यांनी, इतर भाषा जगातून घेण्यापेक्षा मराठी भाषा जगाला देणे हा विचार मांडला. डॉ. विलास गायकर यांनी, जागतिककरणामुळे आर्थिक, सामाजिक, पर्यटन क्षेत्रात झालेले परिणाम व बदलांची चर्चा केली व उपस्थितांना मार्गदर्शन केले.या जागतिकिकरणाच्या प्रभावाने ज्या ज्या क्षेत्रात परिणाम झालेत त्यावर काही मार्ग कसा काढता येईल यावर चर्चा झाली.या चर्चासत्रासाठी जवळपास ५७ अभ्यासकांनी वेगवेगळ्या विषयांवर शोधनिबंध लिहिले असून महाविद्यालयाच्या माध्यमातून या शोधनिबंधाचे प्रकाशन देखील करण्यात आले. या चर्चासत्राचे समन्वयक म्हणून डॉ.विनोद होले, सहसमन्वयक म्हणून प्रा.रसिका सपकाळ यांनी जबाबदारी पार पाडली. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रा.विशाल भोसले, प्रा.दिप्ती मोरे, प्रा.प्रियंका पवार, प्रा.शरद खाकर, प्रा.सोनम मोरे, प्रा.भुषण विशे यांनी मोलाची कामगिरी बजावली.

# मुदखेड येथे तिसरी बौद्ध धम्म परिषद मोठ्या उत्साहात संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी तिसरी अखिल भारतीय बौध्द धम्म परिषद नुकतीच मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम सकाळी ठिक ८:३० वाजता भिख्खू संघाच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. समता सैनिक दलाच्या वतीने पंचशील ध्वजास सलामी देत जय भीम चे आणि बौद्ध धम्माचा विजय असो अशा घोषणा देत ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला यानंतर ९ :३० वाजता बौद्ध धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये समता सैनिक दलाचे पथसंचलन बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथून भीम नगर,जुने पोलीस स्टेशन मराठा गल्ली, गुजरी मोहल्ला,मोंढा भागातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी या बौद्ध धम्म रॅलीची सांगता करण्यात आली आहे. यानंतर दुपारी १२:३० वाजता तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ




बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तिसऱ्या धम्म परिषदेचे उद्धाटन डॉ. उपगुप्त महाथेरो पुर्णा यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ खेम धम्मो महाथेरो मूळावा,डॉ सत्यपाल महाथेरो संभाजीनगर, पययानंद थेरो लातूर, डॉक्टर इंदवंश महाथेरो औरंगाबाद, भिकुनी चारुशीला थेरी नांदेड, शीलरत्न थेरो नांदेड, पयारतन थेरो, महाकाशप थेरो,भिख्खू गगनबोधी मुदखेड,यांनी उपासक उपासिकांना धम्मदेसना दिली. रात्री ८:०० वाजता प्रा. नितेश कराळे, कवि दंगलकार नितीन चंदनशिवे, समता सैनीक दलाचे मार्शल सारीपुत यांची व्याख्याने झाली. या धम्म परिषदे निमित्ताने त्यांनी युवकांना मार्गदर्शन केले. आणि सांगीतले आहे कि, आजच्या युवकांनी आंबेडकर चळवळ जिवंत ठेवली पाहिजे आणि चळवळीचा रथ पुढे घेऊन गेला पाहिजे, युवकांनी व्यसनाच्या आहारी न जाता आय पी एस सी, यूपीएससी, याची तयारी केली पाहिजे. असे प्रमुख व्याख्याते यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी भिम नगर, अशोका नगर, नविअबादी, लुबिंनी नगर, समता नगर, रेल्वे कॉलोनी,भिख्खू संघ बौद्ध तालुक्यातील व शहरातील उपासक, उपासिका, बालक बालिका, जेष्ठ नागरीक व युवकांची मोठ्या संख्येने उपस्थीती हाती.

# थोडक्यात

## बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा कल्याणमध्ये प्रतिवाद

**अक्षराज : भानुदास गायकवाड**




**दि.०४, कल्याण (ठाणे) :** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा प्रतिवाद कल्याणमध्येही उमटला असून, येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात विविध बौद्ध संघटनांच्या वतीने सात दिवसीय धरणे आंदोलन व साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. महाबोधी महाविहार बौद्धांच्या हाती द्यावा तसेच बौद्ध टेम्पल ॲक्ट १९४९ रद्द करण्यात यावा या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. बौद्ध धर्मीयांच्या श्रद्धेला धक्का पोहोचवणाऱ्या वैदिक कर्मकांडांचा निषेध करत महाविहारातील ब्राह्मणी हस्तक्षेप त्वरित थांबवावा, तसेच बौद्ध स्थळी वैदिक विधी करणाऱ्या पांडे पुरोहितांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी आंदोलकांनी केली आहे.

या आंदोलनात कल्याण आणि आसपासच्या अनेक बौद्ध संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला. संबोधी प्रबोधन मंच, कल्याण पूर्व यांच्या वतीने अर्जुन गायकवाड, जगदीश गायकवाड, दिपक गायकवाड, शंकर धावणारे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी या आंदोलनात हजेरी लावली.

बौद्ध धर्मीयांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला शासनाने त्वरित प्रतिसाद द्यावा आणि बौद्धांचे धार्मिक स्थळ त्यांच्याच ताब्यात द्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. पुढील काही दिवसांत या आंदोलनाला आणखी व्यापक स्वरूप मिळण्याची शक्यता आहे.

## आमदार सावंत यांची बदनामी खपवून घेणार नाही - ॲड.अजित खोत

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०४, धाराशिव :** सलग दुसर्यांदा जनतेमधून निवडून आलेले आमदार तथा माजी आरोग्यमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांची बदनामी खपवून घेणार नाही. यापुढे त्यांच्याविषयी अपशब्द उच्चारल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ॲड.अजित खोत यांनी खासदार संजय राऊत यांना दिला आहे.

आरक्षणाच्या मागणीसाठी शेकडो मराठा तरुणांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या कुटुंबीयांना आधार देण्याचे काम आमदार सावंत यांनी केले. मतदार संघामध्ये स्वतः च्या स्वखर्चाने शेतरस्ते बनवले. स्वकर्तृत्वाने आठ साखर कारखाने उभारुन लाखो शेतकर्यांच्या उसाच्या गाळपाचा प्रश्न मार्गी लावला. एवढेच नव्हे तर संस्था व कारखान्याच्या माध्यमातून लाखो तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री असताना धाराशिवमध्ये अनेक आरोग्य उपकेंद्र उभा करुन ग्रामीण भागात आरोग्य सेवा सक्षम केली. आषाढी वारीत वारकर्यांना दिलेल्या आरोग्य सेवेची गिनीज बुकमध्ये नोंद करण्याचे उल्लेखनीय काम आमदार सावंत यांनी केलेलेले आहे.

एका हाताने केलेली मदत दुसर्या हाताला सुद्धा कळू न देणे हा त्यांचा स्वभाव आहे. स्वतःच्या कार्याचा त्यांनी कधी बोभाटा केला नाही. पण धाराशिवचा शिवसेना तालुकाध्यक्ष मयत झाल्यावर त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याचे काम त्यांनी केले. आरोग्य सेवेमध्ये महाराष्ट्रामध्ये विक्रमी भरती केली. पारदर्शकपणे महाराष्ट्रामध्ये भरती करून लाखो तरुणांना सेवेत समाविष्ट करून घेतले अनेक कंत्राटी आरोग्य सेवेतील कामगारांना कायम केले ही सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली.

म्हणून सकाळी उठून साडेनऊ वाजता भोंगा लावायचे बंद करा. वाघ जेव्हा दोन पावले पाठीमागे सरकतो ना त्यावेळेस तो उंच झेप घेण्यासाठी असतो. वाघ शांत झोपला म्हणजे कमजोर समजू नका, दोनदा जनतेतून निवडून येणारे ते आमदार आहेत. तुमच्याप्रमाणे आमदारांच्या जीवावर खासदार झालेले नाहीत. त्यामुळे चुकीचे आरोप करून त्यांची बदनामी करू नका, असा सल्लाही ॲड.खोत यांनी दिला आहे.

## रस्त्यासह विविध मागण्यांसाठी समता गृहनिर्माण संस्थेचे जिल्हाधिकार्यांना निवेदन

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०४, धाराशिव :** शहरातील समतानगर भागातील रस्त्यासह विविध विकासकामांबाबत समता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने जिल्हाधिकारी कीर्ति पुजार यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले की, छत्रपती संभाजी चौक ते डॉ. बाबासाहेब अबिडकर चौक या रस्त्याची हॉट मिक्स कामाची प्रशासकीय मान्यता नगर परिषद धाराशिव यांनी २८ मार्च २०२१ मध्ये दिलेली आहे. सदर रस्त्याचे प्रत्यक्ष काम मागील तीन ते चार महिन्यामध्ये सुरू झाले होते. त्यामध्ये सदरचे कामकाज हे अर्धवट केलेले आहे. सदर कामामध्ये जुने टीव्ही सेंटर ते विजर्सन विहिर हा भाग पूर्णतः वगळून इतर काम झालेले आहे. तसेच सन २०२१ २०२२ मध्ये नगर परिषदेने नवीन विर्सजन विहिर बांधणे व विसर्जन विहिर ते एचडीएफसी बँकेपर्यंतचा कॉकीट रस्ताचा कामास प्रशासकीय मान्यता देवून वर्कऑर्डर देवून ठेकेदाराकडून हे काम देखील अर्धवट करून घेतलेले आहे यामध्ये विर्सजन विहिर ते एचडीएफसी बँकेपर्यंत कॉंक्रीट रस्ता अद्याप केलेला नाही. तरी या दोन्ही कामाची नगर परिषदेकडून माहिती घेवून १५ मार्च २०२५ पूर्वी सदरची दोन्ही कामे सुरू करणे बाबत नगर परिषदेला आदेश द्यावेत. सदरचे अर्धवट झालेल्या कामामुळे रस्त्यावरील खड्डे व धुळीमुळे समता नगरवासीयांना भयंकर त्रास सहन करावा लागत आहे. नगर परिषदेने प्रशासकीय मान्यता देवून वर्कऑर्डर देवूनही कामे अर्धवट झालेली आहेत. परंतु नगर परिषद प्रशासन गप्प का आहे? याची माहिती घेऊन कामकाज त्वरीत सुरू करावे अन्यथा समता नगरवासीय सर्व नागरीक ही आंदोलन करतील. त्यानंतर होणार्या परिणामाची जबाबदारी ही सर्व संबंधीत प्रशासनाची राहील असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनावर समता सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष नाना घाटगे, कैलास पानसे, कुमार पारे, अतुल पाटील, नारायण पाटील, एच. एम. लोमटे, रामचंद्र जोशी, बिभीशन माळी, एस. एस. जगदाळे, सौ. सुरेखा गोकुळ कदम यांची स्वाक्षरी आहे.